# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३८** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०१** **प्रशासक ठराव क्र.:- २७७** **दिनांक :-२७/०५/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. दि.३०/०४/२०२५ बुधवार रोजी सकाळी- ११.३० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.३७ चे कार्यवृत्त कायम करणे.

**विषय :-** दि.३०/०४/२०२५ बुधवार रोजी सकाळी- ११.३० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.३७ चे कार्यवृत्त कायम करणे.

---

वाचा क्र.१ व २ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

दि.३०/०४/२०२५ बुधवार रोजी सकाळी- ११.३० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.३७ चे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देण्यात येत आहे.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३८** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०२** **प्रशासक ठराव क्र.:- २७८** **दिनांक :-२७/०५/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांचेकडिल जा.क्र./न.र/०८७/२०२५ दि.०७/०५/२०२५

३. रचना सहाय्यक यांचा दि.१०/०३/२०२५ चा अभिप्राय

४. सहाय्यक संचालक, नगररचना यांचा दि.१२/०३/२०२५ चा अभिप्राय

५. आयुक्त यांचा दि.१२/०३/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिकेच्या मौजे खेडी बु. गट क्र. ६१/२/अ , ६१/३/ब, ६१/२/क , ६१/२/ब/३/अ, ६१/१ येथील जमीनीवरील आरक्षण क्रं.१८८ पार्कींग हे आरक्षण वगळुन जमिन क्षेत्र रहीवास विभागात समाविष्ठ होणेबाबत.

वाचा क्र.१ व सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांचा वाचा क्रं. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

मौजे खेडी बु. गट नं. गट क्र. ६१/२/अ , ६१/३/ब, ६१/२/क , ६१/२/ब/३/अ, ६१/१ येथील जमीनीवरील आरक्षण क्रं.१८८ पार्कींग हे आरक्षण वगळुन जमिन क्षेत्र रहीवास विभागात समाविष्ठ होणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणे करीता अर्जदार यांच्या अर्जानुसार आरक्षण वगळणे कामी कार्यवाही सुरु करणेकामी प्रशासकीय ठराव क्र.२२८, दि.१५/०१/२०२५ पारित झालेला आहे. त्या अनुषंगाने उक्त फेरबदला बाबतच्या जाहिर सुचनेच्या इंग्रजी व मराठी प्रती शासन राजपत्रात प्रसिध्द करणेकामी आयुक्त यांचे मान्यतेने दि.२३/०१/२०२५ रोजी दैनिक सकाळ वृत्तपत्रात तसेच महाराष्ट्र शासन राजपत्रात,भाग-१, दि.२३/०१/२०२५ पृष्ठांक ३३ ते ३५ वर प्रकाशीत झालेली आहे. तसेच प्रशासकीय इमारत मजला क्र.१५, जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव येथील सहायक संचालक, नगररचना यांचे कार्यालयात जाहीर नोटीस डकविण्यात आलेली असून त्याची प्रती सहसंचालक, नगररचना, नाशिक विभाग, नाशिक व संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडेस दिलेली आहे.

सदरची जाहिर सुचना प्रसिध्द होऊन एक महिन्या पेक्षा जास्त कालावधी झालेला असुन, हरकती सुचना मागविण्याच्या विहीत कालावधीत एकही हरकत/सुचना प्राप्त झालेली नाहीत.

तसेच प्रत्यक्ष जागेवर जाऊन स्थळ निरीक्षण केले असता सदर जमिन उत्तरेकडे जुन्या राष्ट्रीय महामार्गापेक्षा ७ ते ८ फुट खोलगट भागात आहे. तसेच जमिनीचे पश्चिमेस ३०.०० फुट रुंद नाला आहे. त्यामुळे सदर जमिन संपादीत करुन विकसीत करावयाची झाल्यास जमिनीच्या संपुर्ण क्षेत्रास भराव करावा लागुन नाल्यास संरक्षण भिंत बांधकाम करावी लागेल तेव्हाच वाहनतळ विकसीत करणे शक्य होईल अशा परिस्थिती मध्ये जमिन संपादन करुन विकसीत करणे आर्थिक दृष्टया महापालिकेस शक्य नाही तसेच परिसरात एम.आय.डी.सी अंतर्गत ट्रक टर्मिनन्सचे काम प्रगतीपथावर आहे. त्यामुळे सदर जागेची म.न.पास आवश्यकता नाही. तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांच्या मागणीनुसार वर नमुद केल्या प्रमाणे मौजे खेडी बु. गट नं. गट क्र. ६१/२/अ , ६१/३/ब, ६१/२/क , ६१/२/ब/३/अ, ६१/१ येथील जमीनीवरील आरक्षण क्रं.१८८ पार्कींग हे आरक्षण महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये वगळून सदर जमिन क्षेत्र रहीवास विभागात समाविष्ठ करणे कामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये अधिसुचना प्रसिध्द करणेकरीता शासनास प्रस्ताव सादर करावयाचा असल्याने त्यास महासभेची मान्यता मिळण्यासाठी सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाही याची दक्षता घ्यावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३८** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०३** **प्रशासक ठराव क्र.:- २७९** **दिनांक :-२७/०५/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांचेकडिल जा.क्र./न.र/०२३५/२०२५-२६ दि.१५/०५/२०२५
३. रचना सहाय्यक यांचा दि.०५/०४/२०२५ चा अभिप्राय
४. सहाय्यक संचालक, नगररचना यांचा दि.०७/०४/२०२५ चा अभिप्राय
५. आयुक्त यांचा अभिप्राय

**विषय :-** जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) मौजे मेहरुण स.नं.१६८/१/१ पैकी या जमिनीतुन दर्शविलेले आरक्षण क्रं.१५७ हायस्कुल या आरक्षणाने बाधीत जमिनीचे भुसंपादना बाबत.

वाचा क्र.१ व सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांचा वाचा क्रं. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) मौजे मेहरुण स.नं.१६८/१/१ पैकी या जमिनीतुन दर्शविलेले आरक्षण क्रं.१५७ हायस्कुल करीता आरक्षित जमिनीच्या क्षेत्राचे संपादनासंबंधी म.प्रा. व न.र अधिनियमाचे कलम १२७ नुसार खरेदी सुचना जमिन मालक श्री.निरंजन जगन्नाथ पाटील व इतर यांनी दि.२१/१२/२०२३ अन्वये नियोजन प्राधीकरणास दिलेली आहे त्या अनुषंगाने विकास योजना आरक्षणाने बाधीत होणाऱ्या क्षेत्राच्या मोबदल्यात टी.डी.आर बाबत जमिन मालक यांना पत्र जा.क्र./नर/३०८ दि.०६/०६/२०२४ अन्वये विचारणा केली असता त्यांनी खुलासा पत्राव्दारे दि.३१/०७/२०२४ चे पत्रान्वये टी.डी.आर घेणेस नकार दिलेला आहे. तदनंतर जिल्हाधिकारी,जळगांव यांचेकडे भुसपांदन प्रस्तावाबाबतचे डॉकेट तयार करुन महासभा/ प्रशासक यांचेकडेस सादर केले असता प्रशासक ठराव क्रं.१३९ दि.०९/०८/२०२४ अन्वये जमिन मालक यांना टि.डी.आर घेणे संदर्भात पुनश्च: प्रोत्साहीत करण्यात यावे अथवा त्यांना UDCPR नियमाअंतर्गत Reservation Accomodation याबाबत सुध्दा विचारणा करण्यात यावी याप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने प्रशासकीय ठरावाच्या अनुषंगाने जा.क्र./न.र./६३३ दि.२९/०८/२०२४ अन्वये अर्जदार यांना टि.डी.आर घेणे संदर्भात तसेच Reservation Accomodation याबाबत कळविण्यात आलेले होते. तथापि, अर्जदार यांनी आ.क्र.१३५१ दि.०३/०९/२०२४ चे पत्राचे अनुषंगाने टि.डी.आर व Reservation Accomodation बाबत नकार दिलेला असुन रोख स्वरुपात मोबदला मिळणे बाबत विनंती केलेली आहे. त्या अनुषंगाने प्रशासक यांचेकडेस जा.क्र./न.र/८३० दि.०७/१०/२०२४ अन्वये मान्यतेसाठी डॉकेट सादर केले असता प्रशासकीय ठराव क्रं.१९६ दि.०७/१०/२०२४ अन्वये पुनश्च अर्जदार यांना टि.डी.आर व Reservation Accomodation बाबत पुनश्च विचारणा करणे बाबत ठराव पारीत केलेला आहे. त्या अनुषंगाने आ.क्र.२५३६ दि.२७/०१/२०२५ अन्वये अर्जदार यांनी उक्त पर्यायास नकार दिलेला आहे. त्यामुळे सदर आरक्षणाने बाधीत जमिनीचे भुसंपादन करणे आवश्यक झालेले आहे.

अर्जदार यांचे मालकीचे मौजे मेहरुण स.नं.१६८/१/१ या जमिनीतुन दर्शविलेले आरक्षण क्र.१५७ हायस्कुल या आरक्षणा खालील जमिनीचे एकुण क्षेत्र ७१७१.०० चौ.मी असुन आरक्षणाने बाधीत जमिनीचे भुसंपादन प्रस्ताव जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडे सादर करुन भूसंपादन प्रक्रिया ०२ वर्षाच्या आत पुर्ण करणे आवश्यक आहे. या कामी विषयांकीत जमिनीचे सन २०२५-२६ च्या शिघ्रसिध्दगणका मधील दरा नुसार रु.२६४०/- प्रति चौ.मी इतके आहे. त्या अनुषंगाने भुसंपादन कामी अपेक्षीत खर्च खालील प्रमाणे

| प्रयोजन | शिवार | स.नं. | भुसंपादन क्षेत्र | शि.सि.गणक दर/ चौ.मी | अंदाजीत खर्च |
|---|---|---|---|---|---|
| आरक्षण क्रं.१५७, हायस्कुल | मेहरुण | १६८/१/१ पैकी | ७१७१.०० चौ.मी | रु.२६४०/- (२०२५-२६) | रु.१८९३१४४०/- + रु.१८९३१४४०/- |
| | | | | | रु.३७८६२८८०/- |

वरील प्रमाणे रु.३,७८,६२,८८०/- खर्च अपेक्षीत असुन, संयुक्त मोजणीसाठी येणारा खर्च, प्रस्तावातंर्गत वेळोवेळी येणाऱ्या खर्चास व प्रस्ताव जिल्हाधिकारी तथा भुसंपादन अधिकारी,जळगांव यांचेकडेस पाठविणेकामी मान्यता मिळणेबाबत सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

जळगांव शहर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती लक्षात घेता प्रस्तावातील खर्चास मंजूरी देणे योग्य होणार नाही. जमिन मालक यांना टि.डी.आर. घेणे संदर्भात प्रोत्साहीत करण्यात यावे अथवा त्यांना UDCPR नियमाअंतर्गत Reservation Accomondation याबाबत सुध्दा विचारणा करण्यात यावी. याप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी. लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाही व कायदेशीर अडचण निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.३८** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०४** **प्रशासक ठराव क्र.:- २८०** **दिनांक :-२७/०५/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. उपअभियंता, पाणी पुरवठा विभाग यांचेकडिल पा.पु.विभाग/जा.क्र./३९/२०२५-२६ दि.१६/०५/२०२५
३. शहर अभियंता यांचा दि.२४/०४/२०२५ चा अभिप्राय
४. मुख्य लेखा परिक्षक यांचा दि.२९/०४/२०२५ चा अभिप्राय
५. आयुक्त यांचा दि.३०/०४/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** सन २०२४-२५ व २०२५-२६ या वर्षात पाणी पुरवठा व्यवस्था व दुरुस्ती कामी पाईप लाईन दुरुस्ती, व्हॉल दुरुस्ती अंतर्गत कामाच्या फेरफार प्रस्तावानुसार सुधारीत अंदाजपत्रकास व त्यानुसार कामे करुन घेणेस मान्यता देणे.

वाचा क्र.१ व उपअभियंता, पाणी पुरवठा विभाग यांचा वाचा क्रं. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिकेने सन २०२४-२५ व २०२५-२६ या दोन वर्षात पाणी पुरवठा व्यवस्था व दुरुस्ती कामी पाईप लाईन दुरुस्ती, व्हॉल दुरुस्ती, नवीन नळ संयोजन देणे इ. आवश्यक साहित्यासह कामे करणे करीता रक्कम रु.४,०४,८१,४६५/- मात्रचे प्रशासकीय ठराव क्रं./०८७/दि.२२/०९/२०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. सदरचे कामी ई-निविदा प्रक्रिया राबवून श्री.प्रदीप रमेश चौधरी,नाशिक यांना कार्यादेश क्र.पापुवि/४२/२०२४-२५ दि.११/१०/२०२४ नुसार कामाचे आदेश दिलेले आहे.

प्रस्तावित निविदेचे काम हे पाणी पुरवठयाच्या वितरण व्यवस्थेमध्ये (१) नळ संयोजने जोडणी करणे (२) दैनंदीन दुरुस्तीची कामे करणे या दोन भागांत विभाजन करुन एकुण ४,०४,८१,४६५/- किंमतीची दोन वर्षासाठी बाबवार दर तरतूदी नमूद आहे.

सदर कामी काही बाबी या प्रत्यक्षात उपयोगात येणार नसल्याने त्यांचेवरील खर्च हा बचत होणार आहे, मात्र या वेळी प्रत्यक्षात आवश्यक असलेल्या तरतूदी यात अंतर्भाव नसल्याने कामे करण्यास अडचणी निर्माण होत आहे. त्यामुळे मंजुर कामाच्या विवरणात/अंदाजपत्रकात बदल संभवतात. सदर बदल करणेसाठी निविदेतील कलम १४ नुसार अभियंता यांची खात्री होणे अभिप्रेत आहे. त्यानुसार विवरणातील बदल / कामे यांची आवश्यकता असल्याची अभियंता यांची खात्री झालेली आहे.

सदर अतिरिक्त बाबी मजीप्रा दरसूची २०२३-२४ नुसार / दर विश्लेषणानुसार आहे.

१. Supply of D.I.Sluice Valve.
२. Supply of D.I.tamperproof Air Valve.
३. Supply of D.I.mechanical joint Coller Coupling.
४. Supply of D.I.mechanical flange socket.
५. Providing and fixing flanged joints.
६. Work for repair of Sluice Valves with necessary material.
७. Supply of material for repair of D.I.Joint
८. Labor charges for fixing of Mechanical Joints.
९. Supply of Repair coupler.

तरी परिशिष्टातील संभाव्य खर्चानुसार प्रस्तावित / बदल झालेल्या बाबींचा कामांत समावेश करुन, मंजूर खर्चाच्या मर्यादेत भाववाढ न देता करता येणे शक्य असल्याने मंजूर खर्चाच्या मर्यादेत बदललेल्या बाबींचा, अंतर्भाव निविदा कलमाच्या १४ व १५ नुसार सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेवून करता येईल. सुधारीत परिमाणे - बाबी यांचे सुधारीत अंदाजपत्रकास महाराष्ट्र अधिनियमाचे कलम १८९ नुसार महासभेची मान्यता मिळण्यासाठी उपअभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाही व कायदेशीर अडचणी निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.

सही/-
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३८** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०५** **प्रशासक ठराव क्र.:- २८१** **दिनांक :-२७/०५/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. भांडारपाल, भांडार विभाग यांचेकडिल जा.क्र./भांडार/२९/२०२५-२६ दि.२२/०५/२०२५
३. उपायुक्त यांचा दि.२२/०५/२०२५ चा अभिप्राय
४. मुख्य लेखा परिक्षक यांचा दि.२२/०५/२०२५ चा अभिप्राय
५. आयुक्त यांचा दि.२२/०५/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** महानगरपालिका अभिलेख्यांचे अ, ब, क व ड नुसार वर्गीकरण करणे, अभिलेख्यांचे संगणकीकरण करणेबाबत.

वाचा क्र.१ व भांडारपाल, भांडार विभाग यांचा वाचा क्रं. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रं.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.९/१८ (र.व.का) दि.१५ फेब्रुवारी २०१८ नुसार झिरो पेन्डन्सी अँड डेली डिस्पोजल शासकीय व निमशासकीय कार्यालयांसाठी कार्यालयीन कामकाजाची कार्यपध्दती मधील अ) क्रमांक १ कार्यालयातील तसेच अभिलेख कक्षातील अभिलेखांचे निंदणीकरण, वर्गीकरण व अदयावतीकरण करणे, उक्त उपक्रमाच्या पहिल्या टप्यात कार्यालयातील अभिलेखे आणि अभिलेख कक्षातील अभिलेखे यांचे संपुर्ण अदयावतीकरण करण्याचा कार्यक्रम हाती घेणे बाबत निर्देश दिलेले आहेत.

क्षेत्रीय शासकीय व निमशासकीय कार्यालयांसाठी १०० दिवसांच्या कृती आराखडयामध्ये १) कार्यालयामध्ये व कार्यालयाच्या आवारात असणारे अभिलेख निंदणीकरण करुन तपासणी अंती आवश्यक नसल्यास नष्ट करण्यात यावेत तसेच सर्व अभिलेख्यांचे दि.१५/०२/२०१८ नुसार वर्गीकरण करणे बाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

मा.मुख्यमंत्री महोदय यांनी पत्रकार परिषदेमध्ये १०० दिवसांच्या कार्यक्रमाबाबत सुचना केल्या प्रमाणे प्रत्येक कार्यालयाची quality council of india मार्फत तपासणी होणार त्यानुसार मार्कींग केली जाणार आहे. त्या अनुषंगाने महानगरपालिकेतील सन १९९६ पासुन अभिलेखा विभाग व विविध विभागाकडील अभिलेख्यांचे अ,ब,क,ड मध्ये वर्गीकरण व संगणकीकरण करणे इत्यादी कामा करीता अंदाजे खर्च रक्कम रु. ३ कोटी मात्र अपेक्षीत असून अभिलेखे वर्गीकरण व संगणकीकरण या लेखाशिर्षा अंतर्गत अभिलेखा विभागामार्फत अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आलेली आहे. तरी निविदा प्रसिध्द करणेस व त्याकामी येणाऱ्या पर्यायी खर्चास मान्यता मिळण्यासाठी भांडारपाल, भांडार विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३८** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०६** **प्रशासक ठराव क्र.:- २८२** **दिनांक :-२७/०५/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. परिवहन विभाग प्रमुख यांचेकडिल जा.क्र./परिवहन/०१/२०२५ दि.२६/०५/२०२५
३. शहर अभियंता यांचा दि.२६/०५/२०२५ चा अभिप्राय
४. उपायुक्त यांचा दि.२६/०५/२०२५ चा अभिप्राय
५. आयुक्त यांचा दि.२६/०५/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** पीएम ई-बस सेवा परिवहन उपक्रमाच्या अंतर्गत जळगांव शहर व लगत असलेल्या गावांकरीता ई-बस सेवेचा मार्ग निश्चितीबाबत.

वाचा क्र.१ व परिवहन विभाग प्रमुख, परिवहन विभाग यांचा वाचा क्रं. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

केंद्र शासनामार्फत पर्यावरण पुरक शाश्वत वाहतुकीस प्रोत्साहन देणेकामी पीएम ई-बस सेवा योजना दिनांक १६ ऑगष्ट २०२३ रोजी मंजूर करण्यात आलेली आहे. सदर योजने अंतर्गत जळगांव शहर परिवहन वाहतुकीकरीता एकूण ५० नग ई-बसेस उपलब्ध करुन देण्यात येणार असुन प्रस्तावीत बस डेपोच्या प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात आलेली आहे. सदर योजने अंतर्गत जळगांव शहर व लगत असलेल्या गावांकरीता परिवहन सेवा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. सदर परिवहन उपक्रमाच्या अंतर्गत जळगांव शहर व लगत असलेल्या गावांमध्ये ई-बस सेवेचा मार्ग परिक्रमीत करण्याबाबत प्रस्तावीत आहे. तरी सदर मार्ग परिक्रमण स्थानिक नागरिकांच्या तसेच शहरामधील प्रमुख संस्थांच्या दृष्टीनेदखील सोईचे असण्याकरीता महानगरपालिकेमार्फत जाहिर सुचना क्र.परिवहन/२९ दिनांक २७/०१/२०२५ नुसार स्थानिक वृत्तपत्रांमधून सुचना व हरकती मागविण्यात आलेल्या आहेत. सदर जाहिर सुचनेच्या अनुषंगाने महानगरपालिकेकडेस एकूण ७५ सूचना व हरकती प्राप्त असुन त्याचे अवलोकन होऊन पुढील मार्ग निश्चीतीच्या अनुषंगाने स्थानिक लोकप्रतिनिधी मा.श्रीमती स्मिताताई वाघ, लोकसभा सदस्य, जळगांव लोकसभा मतदार संघ व मा.श्री.सुरेश दामू भोळे (राजूमामा) विधानसभा सदस्य, जळगांव शहर यांच्या अध्यक्षतेखाली यांच्या समवेत दिनांक ०८/०५/२०२५ रोजी बैठक आयोजीत करण्यात आलेली होती. सदर बैठकीमध्ये झालेल्या चर्चेनुसार खालीलप्रमाणे मार्ग निश्चित करण्यात आलेले आहेत.

| मार्ग क्र. | प्रस्तावीत मार्ग |
|---|---|
| १ | जळगांव शहर जुने बस स्टॅण्ड ते स्वातंत्र चौक ते आकाशवाणी चौक ते महामार्गे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विदयापीठ |
| २ | जळगांव शहर जुने बस स्टॅण्ड ते स्वातंत्र चौक ते आकाशवाणी चौक ते महामार्गे पाळधी |
| ३ | जळगांव शहर जुने बस स्टॅण्ड ते नेरी नाका ते अजिंठा चौफुली ते महामार्गे डॉ.उल्हास पाटील मेडीकल कॉलेज व हॉस्पीटल,जळगांव खुर्द |
| ४ | जळगांव शहर जुने बस स्टॅण्ड ते स्वातंत्र चौक ते आकाशवाणी चौक ते इच्छादेवी चौक ते शिरसोली मार्गे वावडदा ते म्हसावद |
| ५ | जळगांव शहर जुने बस स्टॅण्ड ते नेरी नाका ते अजिंठा चौफुली ते कुसुंबा मार्गे उमाळा फाटा |
| ६ | जळगांव शहर जुने बस स्टॅण्ड ते शिवाजी नगर मार्गे कानळदा |
| ७ | जळगांव शहर जुने बस स्टॅण्ड ते ममुराबाद मार्गे विदगांव |
| ८ | जळगांव शहर जुने बस स्टॅण्ड ते असोदा, भादली ते शेळगांव |
| ९ | जळगांव शहर जुने बस स्टॅण्ड ते स्वातंत्र चौक ते आकाशवाणी चौक ते काव्यरत्नावली चौक मार्गे हरिविठ्ठल नगर |

| | |
|---|---|
| १० | जळगांव शहर जुने बस स्टँण्ड ते स्वातंत्र चौक ते आकाशवाणी चौक ते इच्छादेवी चौक ते शिरसोली नाका ते रायसोनी नगर मार्गे, मोहाडी |
| ११ | जळगांव शहर जुने बस स्टँण्ड ते कोर्ट चौक ते रिंगरोड ते रेल्वे उड्डाण पुल ते पिंप्राळा मार्गे हुडको |
| १२ | जळगांव शहर जुने बस स्टँण्ड ते स्वातंत्र चौक ते आकाशवाणी चौक ते काव्यरत्नावली चौक ते संत गाडगेबाबा चौक ते कोल्हे हिल्स |
| १३ | एकनाथ नगर, मेहरुण ते नमस्कार मॉल ते इच्छादेवी चौक ते आकाशवाणी चौक ते स्वातंत्र चौक मार्गे रेल्वे स्टेशन |
| १४ | जळगांव शहर जुने बस स्टँण्ड ते शिवाजी नगर पुलामार्गे निमखेडीगांव |
| १५ | जळगांव शहर जुने बस स्टँण्ड ते कोर्ट चौक ते रिंगरोड ते गणेश कॉलनी |
| १६ | शिरसोली नाका ते इच्छादेवी चौक ते पांडे डेअरी ते पुष्पलता बेंडाळे चौक मार्गे जुने बस स्टँण्ड |
| १७ | जळगांव शहर जुने बस स्टँण्ड ते स्वातंत्र चौक ते आकाशवाणी चौक ते इच्छादेवी चौक ते शिरसोली |
| १८ | जळगांव शहर जुने बस स्टँण्ड ते नेरी नाका ते अजिंठा चौफुली ते कुसुंबा ते चिंचोली गांव ते धानवड |
| १९ | एकनाथ नगर, मेहरुण अशोक किराणा ते अजिंठा चौफुली ते नेरी नाका ते जुने बस स्टँण्ड |
| २० | मेहरुण ते हॉटेल कस्तुरी ते कुसुंबा ते चिंचोली गांव |
| २१ | जळगांव एम.आय.डी.सी.परिसर - अजिंठा चौक ते जळगांव तोल काटा ते एफ सी आय गोडाऊन ते भारत पेट्रोलियम ते विनुज वर्ल्ड ते गोदावरी कॉलेज ते महामार्ग अजिंठा चौक |
| २२ | जळगांव शहर जुने बस स्टँण्ड ते कोर्ट चौक ते रिंगरोड ते रेल्वे उड्डाण पुल ते पिंप्राळा मार्गे सावखेडे |
| २३ | जळगांव शहर जुने बस स्टँण्ड ते स्वातंत्र चौक ते आकाशवाणी चौक ते विदयुत कॉलनी ते शिवकॉलनी मार्गे, आशाबाबा नगर ते खंडेराव नगर पुल |

उपरोक्त मार्गावर नागरिकांच्या सोयीनुसार व वाहतुकीस अडथळा होणार नाही अश्या पध्दतीने बस थांबे घेणेबाबत सदर बैठकीत सन्मा.सदस्य यांच्यामार्फत सुचना करण्यात आलेल्या आहेत. तरी उपरोक्त मार्ग दिनांक ०८/०५/२०२५ रोजीच्या बैठकीत निश्चीत करण्यात आलेले असुन सदर मार्गावर ई-बसेसचे परिवहन होणेकरीता मान्यता मिळण्यासाठी परिवहन विभाग प्रमुख, परिवहन विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३८** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०७** **प्रशासक ठराव क्र.:- २८३** **दिनांक :-२७/०५/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. अधिक्षक, महिला व बालकल्याण विभाग प्रमुख यांचेकडिल जा.क्र./म.बा.क./४२/२०२५-२६ दि.२६/०५/२०२५
३. उपायुक्त (सा.क.) यांचा दि.२२/०५/२०२५ चा अभिप्राय
४. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.२६/०५/२०२५ चा अभिप्राय
५. आयुक्त यांचा दि.२६/०५/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिका संचलित शहरातील एकुण २६ बालवाडया हया महिला व बालकल्याण विभागातंर्गत चालविल्या जात आहे. त्यानुसार सेमी इंग्रजी माध्यम बालवाडीच्या शिक्षिका व मदतनीस यांची तसेच मराठी माध्यम बालवाडीच्या शिक्षिका व मदतनीस यांची दिनांक १६/०४/२०२५ ते ३१/०५/२०२५ या कालावधीतील उन्हाळी सुटीत त्यांची सेवा खंडीत करुन त्यांना दिनांक ०२/०६/२०२५ ते ३०/११/२०२५ पावेतोच्या कालावधीसाठी विहित अटी शर्तीचे बंधपत्र / हमीपत्र यांचे अधिन राहुन तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर नियुक्ती देणे बाबत तसेच सेमी इंग्रजी माध्यमातील बालवाडी शिक्षिका श्रीमती सुनिता श्रावण पाटील यांनी वैयक्तिक कारणास्तव दिलेला राजीनामा मंजुर करणेबाबत.

---

वाचा क्र.१ व अधिक्षक, महिला व बालकल्याण विभाग यांचा वाचा क्रं. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

मा.उपसंचालक नगरपालिका प्रशासन संचालनालय यांचेकडील आदेश क्र.MCAN/१७९१/प्र.क्र./१५१/११/०४ दिनांक १७ सप्टेंबर १९९२ अन्वये बालवाडयांना कायमस्वरुपी मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

त्या अनुषंगाने जळगांव महानगरपालिका संचलित बालवाडया हया महिला व बालकल्याण विभागामार्फत चालविल्या जात आहे. त्यानुसार सेमी इंग्रजी माध्यम बालवाडीच्या १९ शिक्षिका व ९ मदतनीस यांची आयुक्त यांचेकडील आदेश क्र./ ज.श.म.न.पा./म.बा.क./बालवाडी १०२८ दिनांक ०४/०७/२०२४ अन्वये व मराठी माध्यम बालवाडीच्या १० शिक्षिका व ९ मदतनिस यांची आयुक्त सो यांचेकडील आदेश क्र./ज.श.म.न.पा./म.बा.क./बालवाडी १०२९ दिनांक ०४/०७/२०२४ चे आदेशान्वये दिनांक १६/०४/२०२४ ते दिनांक १४/०६/२०२४ या कालावधीतील उन्हाळी सुटीतील त्यांची सेवा खंडीत करुन बालवाडी शिक्षिका व मदतनीस या पदासाठी दिनांक १५/०६/२०२४ ते दिनांक ३०/११/२०२४ करिता पावेतो रु.१००/- चे स्टॅम्पपेपरवर विहित बंधपत्र, हमीपत्र त्यांचेकडून करुन घेवुन त्यांना तात्पुरत्या स्वरुपात मानधनावर नियुक्ती आदेश देण्यात आलेले होते. त्यास महासभा/ प्रशासकीय ठराव क्र.१०८ दिनांक १९/०७/२०२४ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली होती.

तद्नंतर जळगांव म.न.पा. संचलित मराठी माध्यमातील व सेमी इंग्रजी माध्यमातील तात्पुरत्या स्वरुपातील मानधनावरील नियुक्त बालवाडीतील शिक्षिका व मदतनीस यांच्या नियुक्ती आदेशाचा कालावधी दिनांक ३०/११/२०२४ रोजी समाप्त झाला./ संपुष्टात आला. ६ महिन्यांचे नियुक्तीनंतर २-३ दिवसांचा खंड देवून (म्हणजे त्यांना २-३ दिवसांची त्यांची सेवा खंडीत करुन) दिनांक ०४/१२/२०२४ ते १५/०४/२०२५ पावेतो उक्त वर नमुद आदेशातील मराठी माध्यमातील व सेमी इंग्रजी माध्यमातील तात्पुरत्या स्वरुपातील मानधनावरील नियुक्त केलेल्या बालवाडीतील शिक्षिका व मदतनीस यांना सर्व अटी व शर्तीनुसार तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर नवीन नियुक्ती आदेश म.न.पा. अधिनियम १९४९ चे कलम ५३ मधील तरतुदीनुसार यापूर्वीचे बालवाडी शिक्षिका व मदतनीस यांचे मानधन

नियुक्तीचे आदेश क्र.१०२८ व १०२९ दि.०४/०७/२०२४ च्या दोनही आदेशांमधील नमुद सेमी इंग्रजी माध्यम बालवाडीच्या १९ शिक्षिका व ९ मदतनीस यांची आयुक्त यांचेकडील आदेश क्र./ज.श.म.न.पा./म.बा.क./बालवाडी २६३७ दिनांक ०९/१२/२०२४ अन्वये व मराठी माध्यम बालवाडीच्या १० शिक्षिका व ९ मदतनीस यांची आयुक्त यांचेकडील आदेश क्र./ज.श.म.न.पा./म.बा.क./बालवाडी २६३६ दिनांक ०९/१२/२०२४ चे आदेशान्वये दिनांक ०१/१२/२०२४ ते दिनांक ०३/१२/२०२४ या कालावधीतील त्यांची सेवा खंडीत करुन बालवाडी शिक्षिका व मदतनीस या पदासाठी दिनांक ०४/१२/२०२४ ते दिनांक १६/०४/२०२५ पावेतो महासभा/ प्रशासक ठराव क्र.२०८ दिनांक ०९/१२/२०२४ चे मान्यतेने सर्व अटी व शर्तीनुसार रु.५००/- चे स्टॅम्पपेपरवर विहित बंधपत्र, हमीपत्र त्यांचेकडून करुन घेवुन त्यांना तात्पुरत्या स्वरुपात मानधनावर नियुक्ती आदेश देण्यात आले. त्यास महासभा/ प्रशासकीय ठराव क्र.२०८ दिनांक ०९/१२/२०२४ अन्वये ठराव पारित करुन प्रशासकीय ठरावान्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली होती.

तद्नंतर नियुक्ती आदेश क्र.२६३६ दिनांक ०९/१२/२०२४ अ.क्र.२ मधील सेमी इंग्रजी माध्यमातील शिक्षिका श्रीमती सुनिता श्रावण पाटील यांनी दिनांक १३/०१/२०२५ रोजी मला वैयक्तिक कारणास्तव सदरचे काम करणे शक्य नसल्याचे कारण दर्शवून त्यांनी स्वखुशीने सदरच्या पदाचा राजीनामा लिहून महानगरपालिका प्रशासनाकडे पाठविलेला आहे असुन तो स्विकृत होवून त्यास मान्यता मिळावी.

आयुक्त तथा प्रशासक यांचे आदेश/ज.श.म.न.पा./म.बा.क./बालवाडी/जा.क्र. २६३६ दिनांक ०९/१२/२०२४ अन्वये व सेमी इंग्रजी माध्यम बालवाडीच्या १९ शिक्षिका व ९ मदतनीस यांची तसेच आदेश/ज.श.म.न.पा./म.बा.क./बालवाडी/जा.क्र. २६३७ दिनांक ०९/१२/२०२४ चे आदेशान्वये मराठी माध्यम बालवाडीच्या १० शिक्षिका व ९ मदतनीस यांच्या बालवाडया मानधन तत्वावरील नियुक्ती आदेशाचा कालावधी दिनांक १५/०४/२०२५ रोजी समाप्त झाला आहे व सदरच्या बालवाडयांना दिनांक १६/०४/२०२५ ते ३१/०५/२०२५ या कालावधीत उन्हाळी सुटया असुन दिनांक १६/०४/२०२५ ते ३१/०५/२०२५ पर्यंत बालवाडी शिक्षिका व मदतनीस यांना त्यांचे मानधन सेवेतुन कार्यमुक्तीचे / सेवामुक्तीचे / सेवा खंडीत करण्याचे कामी आदेश आयुक्त तथा प्रशासक यांचेकडील जा.क्र./ज.श.म.न.पा./म.बा.क./५८ व ५९ दिनांक ०४/०४/२०२५ ने त्यांना निर्गमित करण्यात आलेले आहे.

तथापि, सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात म.न.पा. संचलित बालवाडयांना दिनांक १६/०४/२०२५ ते दिनांक ३१/०५/२०२५ या कालावधीत उन्हाळी सुटया असुन या बालवाडी विभागाकडील मागील नस्तींचे अवलोकन केले असता सदर उन्हाळी सुटयांच्या सेवा खंडानंतर दिनांक ०२/०६/२०२५ ते ३०/११/२०२५ पावेतो उक्त म.न.पा. संचलित मराठी माध्यमाच्या व सेमी इंग्रजी माध्यमाच्या बालवाडयांकरिता तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर नवीन नियुक्ती आदेश शिक्षिका व मदतनीस यांना देणे आवश्यक आहे.

म.न.पा. अधिनियम १९४९ चे कलम ५३ मधील तरतुदीनुसार म.न.पा. संचलित बालवाडयांकरीता तात्पुरत्या स्वरुपातील मानधन नियुक्ती आदेश देणे आवश्यक असल्याने दिनांक ०२/०६/२०२५ ते ३०/११/२०२५ या सन २०२५-२६ च्या शैक्षणिक कालावधीसाठी दिनांक ०४/०७/२०२४ च्या आदेशात नमुद मराठी माध्यमाच्या १० शिक्षिका व ९ मदतनीस यांना तसेच सेमी इंग्रजी माध्यमाच्या १८ शिक्षिका व ९ मदतनीस यांना तात्पुरत्या स्वरुपात दिनांक ०१/०६/२०२५ ते ३०/११/२०२५ या कालावधीसाठी मानधन तत्वावर नव्याने नियुक्ती आदेश देणे झालेस त्यास महासभा/प्रशासक ठरावान्वये प्रस्तुत प्रकरणी मान्यता घेणे उचित राहील.

तसेच त्यांचे मानधन हे जळगांव महानगरपालिका प्रशासनाने यापूर्वी पारित केलेल्या महासभा ठराव क्र.११७१ दिनांक ०७/०७/२०२३ चे मंजुर ठरावानुसार बालवाडी शिक्षिका यांचे मानधन रु.१०,०००/- व मदतनीस यांचे मानधन रु.५५००/- मात्र याप्रमाणे मंजुर करण्यात आला आहे. त्यानुसार त्यांचे मानधनासाठी दरमहा येणारा खर्च रु.३,८९,०००/- प्रती माहे या प्रमाणे येणार असुन त्यास महासभा/प्रशासक ठरावाव्दारे मान्यता घेणे आवश्यक आहे. करिता सदर मानधन तत्वावरील म.न.पा. संचलित मराठी माध्यम व सेमी इंग्रजी माध्यमातील बालवाडयांकरीता बालवाडी शिक्षिका व मदतनीस यांचे दिनांक ३०/११/२०२५ पावेतोचे एकुण ६ महिनेचे कालावधी करिता त्यांना मानधन अदा करावयाचा अंदाजीत खर्च रक्कम रु.२३,३४,०००/- मात्रचा खर्च येईल व डिसेंबर २०२५ ते एप्रिल २०२६ पावेतो अंदाजीत रु.१९,४५,०००/- मात्र इतका मानधन खर्च येईल. त्यानुसार बालवाडी शिक्षिका व मदतनीस यांच्या जुन २०२५ ते एप्रिल २०२६ या कालावधीत त्यांच्या मानधनासाठी दरमहा येणारा अंदाजित खर्च रु.३,८९,०००/- या प्रमाणे X ११ महिन्यांकरीता = असा एकंदरीत एकुण अंदाजित खर्च रु.४२,७९,०००/- इतका येणार

आहे. त्याकरिता सन २०२५-२६ च्या महापालिका अंदाजपत्रकातील महिला व बालकल्याण लेखाशिर्षकातील ५% राखीव निधीमधुन खर्च करणेस महासभा / प्रशासक यांची मान्यता मिळणेस सादर.

जळगांव शहर महानगरपालिका संचलित शहरातील एकुण २६ बालवाडयांमधील मराठी माध्यमाच्या १० शिक्षिका व ९ मदतनीस यांना तसेच सेमी इंग्रजी माध्यमाच्या १८ शिक्षिका व ९ मदतनीस यांच्या तात्पुरत्या स्वरुपातील मानधन नियुक्त्यांचा कालावधी दि.१५/०४/२०२५ रोजी समाप्त झाल्याने बालवाडी शिक्षिका व मदतनीस यांची दिनांक १६/०४/२०२५ ते ३१/०५/२०२५ या कालावधीतील उन्हाळी सुटीतील सेवा खंडीत करुन त्यांना दिनांक ०२/०६/२०२५ ते ३०/११/२०२५ पावेतोच्या कालावधीसाठी मानधन तत्वावर विहित अटी शर्तीचे बंधपत्र व हमीपत्र यांचे अधीन राहुन नियुक्ती आदेश देणेस व याकामी येणारा अंदाजित खर्च रक्कम रु.४२,७९,०००/- मात्र सन २०२५-२६ या वर्षात म.बा.क. निधीचे ५% राखीव निधीतुन करणेस तसेच सेमी इंग्रजी माध्यमातील बालवाडी शिक्षिका श्रीमती सुनिता श्रावण पाटील यांनी वैयक्तिक कारणास्तव दिलेला राजीनामा मंजुर करणेस मान्यता मिळण्यासाठी अधिक्षक, महिला व बालकल्याण विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**